


# बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन-अध्यापन

## शिक्षक मार्गदर्शिका

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे -३०.

# बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन–अध्यापन : शिक्षकांसाठी मार्गदर्शिका




शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

ज्ञानसेवा तु साफल्यम्

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे –३०.

**प्रेरणा**
मा. ना. विनोद तावडे, मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य

**मार्गदर्शन**
मा. नंद कुमार (भा.प्र.से.), प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई

**प्रोत्साहन**
मा. डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से.), आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

**संपादक**
गोविंद नांदेडे, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे

**कार्यकारी संपादक**
शिवाजी पांढरे, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे

**लेखन -** किशोर दरक

**समन्वयक**
१. शैलजा दराडे, विभाग प्रमुख, समावेशक शिक्षण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे
२. मंगला वाव्हळ, अधिव्याख्याता, समावेशक शिक्षण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे
३. अलकनंदा सानप, कार्यक्रम आधिकारी, टाटा ट्रस्ट

या पुस्तिकेची निर्मिती महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३० यांनी टाटा ट्रस्ट व क्वालिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट यांच्या सहकार्याने करण्यात आली आहे. http://www.quest.org.in | quest@quest.org.in

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद)
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे-३०
दूरध्वनी - २४४८१२६९, २४४७६९३८

**मुद्रक -** रुना ग्राफिक्स, स. नं. ६४, वडगाव बु.,सिंहगड रोड, पुणे-४१

**प्रथम आवृत्ती - २०१६**

© सर्व शिक्षा अभियान अंतर्गत विनामुल्य वितरणासाठी

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**

**विनोदजी तावडे**
मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य.

# शुभ संदेश

महाराष्ट्र हे बहुभाषिक व बोली भाषांनी समृद्ध असलेले राज्य आहे. प्रत्येक समाजाची विशिष्ट बोलीभाषा आहे. आज शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले आहे. प्रमाण मराठी भाषा हे शिक्षणाचे माध्यम आहे. प्राथमिक शिक्षण ही शिक्षणाची अतिमहत्त्वाची पायरी आहे. ''सर्वांसाठी शिक्षण'' ही एक संकल्पना नसून शासनाचा तो निर्धार आहे.

विविध बोलीभाषिक विद्यार्थी या प्रमाणभाषेतून शिक्षणाचे धडे गिरवतात. वयाच्या ६ व्या वर्षापर्यंत घरामध्ये अनौपचारिक शिक्षणाला सुरुवात झालेली असते, त्या शिक्षणाची भाषा त्यांची बोलीभाषा असते. वयाच्या ६ व्या वर्षी जेव्हा शाळेमध्ये प्रमाण भाषा कानावर पडते, तेव्हा विद्यार्थ्यांचा भाषिक गोंधळ होतो. मनात न्यूनगंड निर्माण होतो. शिक्षणाच्या या पहिल्या टप्प्यावरच विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाविषयी नावड निर्माण होऊ शकते.

ही परिस्थिती दूर करणे गरजेचे आहे. यासाठी शासनाने मुलांचे भावविश्व समोर ठेवून द्विभाषिक पुस्तकांची निर्मिती केली आहे. या पुस्तकांचा अध्ययन-अध्यापनात प्रभावी वापर कसा करता येईल यासाठी ''बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन, अध्यापन : शिक्षक मार्गदर्शिका'' या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. या पुस्तिकेमध्ये औपचारिक भाषा शिक्षणात मुले सुरुवातीस मागे पडण्याच्या कारणांचा ऊहापोह केला आहे. तसेच बहुभाषिक वर्ग अध्यापनात शिक्षकांनी सक्षम होण्यासाठी मार्गदर्शन केले आहे. सीमावर्ती व शहरी बहुभाषिक वर्गातील भाषा शिक्षणाचा उपक्रम विशद करताना आदिवासी व शहरी भागातील अनुक्रमे द्विभाषिक व बहुभाषिक वर्ग या मधील फरक व उपाययोजनाही सुचविल्या आहेत. द्विभाषिक पुस्तके व आदिवासी साहित्याचा उपयोग निवड व गरजा या पुस्तिकेत स्पष्ट केल्या आहेत. बहुभाषिक वर्गातील मुलांचे मूल्यमापन याबाबतही पुस्तिकेत मार्गदर्शन केले आहे.

आपल्या कार्यक्षेत्रातील भागाचे सर्वेक्षण करणे, मुलांचा शोध घेणे, त्यांना शाळेत आणून शिकविणे, त्यांची उपस्थिती टिकविणे, त्यांच्या बोलीभाषेचा आदर करणे व त्यांना इतर विद्यार्थ्यांबरोबर शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे आवश्यक आहे व या सर्व बाबींसाठी या पुस्तिकेचा शिक्षकांना चांगला उपयोग होईल, याची मला खात्री आहे. शिक्षक या पुस्तिकेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतील व या बहुभाषिक परिस्थितीतील मुलांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यांना त्यांच्या बोलीभाषेकडून प्रमाण भाषेकडे आणण्याचा प्रयत्न करतीलच.

या उपक्रमशील पुस्तिकेस शुभेच्छा !

धन्यवाद...

**विनोद तावडे**

# मनोगत

शिक्षक मित्रांनो !

आपल्या शाळेत केवळ बोलीभाषा बोलणारे आणि समजणारे विद्यार्थी असतील आणि त्यांना प्रमाण मराठी येत नसेल तर अशा वेळी बालकांना शिकण्यात गोडी वाटत नाही. या बालकांना बोलीभाषेकडून प्रमाण मराठीकडे कसे घेऊन जाता येईल याचे विवेचन या छोटेखानी पुस्तिकेत अत्युत्कृष्ट पद्धतीने केले आहे. बोलीभाषेच्या माध्यमातून जेव्हा मुलांना प्रमाण मराठी भाषेकडे वळवतो तेव्हा ते आनंदाने शिकू लागतात. त्यांना शाळा आवडू लागते आणि आत्मविश्वास निर्माण होतो. ही पुस्तिका खालीलप्रमाणे शिक्षकांना उपयुक्त आहे.

१) केवळ बोलीभाषा बोलल्या जाणाऱ्या शाळेत एखाद्या नवीन शिक्षकाची नियुक्ती झाली असून त्याला ती बोलीभाषा अवगत नसेल.

२) अशा शाळेवर एखाद्या शिक्षकाची बदलीने पदस्थापना झाली असून त्याला ती बोलीभाषा अवगत नसेल.

३) अनेक वर्षे अशा बोलीभाषा बोलल्या जाणाऱ्या शाळेत असून जे शिक्षक परंपरागत पद्धतीने प्रमाण मराठी शिकवत असतात. अशा शिक्षकांनी पुस्तिकेत सांगितलेल्या बाबी प्राधान्यक्रमाने शिकून घ्याव्यात आणि नमूद केलेले शैक्षणिक साहित्य निर्माण करून त्याचा वर्ग अध्यापनात वापर करावा.

४) ज्या माध्यमाची शाळा आहे त्यापेक्षा वेगळी भाषा बोलणारे विद्यार्थी त्या शाळेमध्ये असतात.

५) राज्यात एकूण ६० बोलीभाषा बोलल्या जातात त्यापैकी १६ भाषा आदिवासी बोलीभाषा आहेत, त्याशिवाय बोलल्या जाणाऱ्या ४४ बेगमी बोलीभाषा आहेत. अशा राज्यातील एकूण ६० बोलीभाषा बोलल्या जाणाऱ्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी या मार्गदर्शक पुस्तिकेचा उपयोग होणार आहे.

६) मोठ्या शहरात इतर राज्यातून येणारी एक दोन बालके अन्य भाषा बोलणारी किंवा एकाच वर्गात एकपेक्षा अधिक भाषा बोलणारे विद्यार्थी असतात. एकाच वर्गात राज्याच्या विविध भागातून येणारी दोन ते तीन भाषा समजणारी/बोलणारी अशी मुलेही असतात. अशा वर्गात अध्यापन करण्यासाठी ही पुस्तिका शिक्षकांना मार्गदर्शक ठरणार आहे.

**नंद कुमार (भा.प्र.से)**
प्रधान सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने आदिवासी बोलीभाषा प्रकल्पांतर्गत आदिवासी बोलीभाषांमधून विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार केले आहे. प्रामुख्याने विद्यार्थी व शिक्षक यांना उपयोगी ठरेल अशी पाठ्यपुस्तके, शिक्षकांसाठी हस्तपुस्तिका, शब्दकोश, गाणी व गोष्टी इ. शैक्षणिक साहित्य तयार केले आहे. महाराष्ट्र राज्यात आदिवासी बोलीभाषांसह एकूण साठ बोलीभाषा बोलल्या जातात. महाराष्ट्रात शासकीय शाळांचे माध्यम प्रमाण मराठी भाषा आहे. राज्यातील सुमारे २८ टक्के मुलांची शिकण्याची भाषा घराच्या/परिसराच्या भाषेपेक्षा भिन्न असल्याचे विद्या परिषदेच्या २०१४ च्या सर्वेक्षणानुसार दिसून आले आहे. अशा परिस्थितीत भाषा वास्तवाचे योग्य भान असणे व योग्य अध्यापनशास्त्राचा अवलंब करणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने बहुभाषिक वर्गात अध्ययन-अध्यापन करताना उपयोगी पडेल अशी ही मार्गदर्शिका आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. या पुस्तिकेमध्ये औपचारिक भाषा शिक्षणात मुले सुरुवातीपासून मागे पडण्याची कारणे, बहुभाषिक वर्गाविषयी शिक्षकांमध्ये संवेदनशील दृष्टिकोन निर्माण करणे, बहुभाषिक वर्गाध्यापनात शिक्षक काय करू शकतात? हे अत्यंत सुगम पद्धतीने या पुस्तिकेत विशद केले आहे.

सीमा भागातील आणि मोठ्या शहरातील बहुभाषिक वर्गातील भाषा शिक्षणाची योजना स्पष्ट करताना आदिवासी द्विभाषिक वर्ग आणि शहरातील बहुभाषिक वर्ग या समस्यांतील फरक व उपाययोजना सुचवली आहे. द्विभाषिक पुस्तके कोठे उपयुक्त ठरतील. आदिवासी साहित्याची भाषा शिक्षणातील उपयुक्तता आणि मर्यादा पुस्तके, निवडीची गरज या मार्गदर्शक पुस्तिकेत स्पष्ट केली आहे.

बहुभाषिक वर्गातील मुलांची लेखी अभिव्यक्ती आणि मूल्यमापन हा अत्यंत महत्त्वाचा विषय नेमका कसा सोडवावा याबाबतही मार्गदर्शन केलेले आहे.

शिक्षकांच्या समस्यांची तयार उत्तरे मार्गदर्शिकेत मिळणार नाहीत पण आपली समस्या आपण कशी सोडवावी यासाठी दिशादर्शक म्हणून ही मार्गदर्शिका उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

**गोविंद नादेंडे**

(संचालक)

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व

प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे.

अनुक्रमणिका पृष्ठ क्रमांक


बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन–अध्यापन : भूमिका ........................... ०१

(१) बहुभाषिक वर्गाविषयीचे पालक आणि समाजामध्ये असणारे समज आणि त्यांची मते ........................................................ ०३

(२) बहुभाषिक वर्गाविषयी शिक्षकांमध्ये संवेदनशील दृष्टीकोन वृद्धींगत करणे – आव्हाने आणि शक्यता.................................. ०५


(३) शाळेतील सुरुवातीची दोन वर्षे आणि बहुभाषिकता .......................... ०६

(४) सीमाभाग आणि मोठ्या शहरांमधील वर्गांमधील बहुभाषिकता .............. १०

(५) अध्यापन साहित्य म्हणून विविध साधनांचा वापर ............................ १२

(६) बहुभाषिक वर्गात मुलांची लेखी अभिव्यक्ती आणि तिचे मूल्यमापन.......... १५

परिशिष्ट – उपलब्ध साहित्याची संकीर्ण यादी ..................................... १७

# बहुभाषिक परिस्थितीतील अध्ययन–अध्यापन : भूमिका

या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शालेय शिक्षण विभागाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' (पी.एस.एम.) जी. आर. निर्गमित करून विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत वाढ घडवून आणण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखला आहे. पी.एस.एम. मध्ये संपादणूक वाढीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याचा विचार केलेला आहे आणि सुरुवातीला प्रथम भाषा आणि गणितातील प्रभुत्व पातळी वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. साहजिकच प्रत्येक विद्यार्थ्याच्या शिक्षणातल्या संभाव्य अडचणींचा विचार केला जाणे अपेक्षित आहे. भाषा येत नसल्यामुळे गणित, सामाजिक शास्त्रे, विज्ञान इत्यादी अभ्यासक्रमीय विषयांमधील संबोध संपादणुकीत बाधा येते, असे अनेक अभ्यासक मानतात. या दृष्टीने विचार केल्यास योग्य प्रकारचे, दर्जेदार भाषा शिक्षण ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची सुरुवात ठरते.

'भाषा' हा शिक्षणाचा पाया आहे. बोलणे, भावना व्यक्त करणे, संवाद साधणे, विचार करणे या सर्व क्रियांचे माध्यम (आणि स्रोत) भाषा असते. भाषेशिवाय संप्रेषण किंवा माहितीचे चलनवलन अशक्य आहे. शाळकरी वयातील किंवा त्या आधीच्या वयातील मुलांबाबत बोलायचे झाले तर वाढत्या कुतूहलाने जगाचा ठाव घेणारी किंवा जगाशी संवाद साधू पाहणारी मुले घराच्या आणि परिसराच्या भाषेतून बोलायला सुरुवात करतात. मुलांकडून साधला जाणारा संवाद, त्यांचे भावनिक आणि वैचारिक व्यक्त होणे भाषेच्या परिचयावर, अनुभवावर अवलंबून असते. उत्स्फूर्तता हे मुलांकडून साधल्या जाणाऱ्या संवादाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते.

भारतीय उपखंडात, विशेषतः भारतात भाषेचे अफाट वैविध्य आहे. 'दर कोसाला भाषा बदलत जाते' असा सामाजिक समज शब्दशः खरा वाटावा इतकी भाषिक विविधता आपल्या देशात आढळते. इतकेच नव्हे तर एकापेक्षा जास्त भाषा एकत्र नांदत आहेत, अशी परिस्थिती देशाच्या बहुतेक भागात सहजपणे दिसते. बहुतेक भारतीय लोक समाजात एकत्र राहिल्यामुळे आपोआपच किमान द्विभाषिक असतात. बहुभाषक परिसरामुळे एकाच वेळी तीन किंवा तीनपेक्षा जास्त भाषा अवगत केलेल्या बालकांची देशातली संख्यादेखील लक्षणीय असल्याचे भाषाशास्त्राचे अभ्यासक मानतात. औपचारिक शिक्षणामध्ये व्यवहारातल्या भाषा वापराच्या पुढील पातळीवरच्या भाषिक प्रगल्भतेची अपेक्षा असते. ही भाषिक प्रगल्भता भाषा शिक्षणातून साधली जाते का, हा कळीचा प्रश्न आहे. अनेक कारणांमुळे औपचारिक भाषा शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच बहुसंख्य मुले अडखळू लागतात. त्यापैकी काही महत्त्वाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील-

- भाषा अध्यापन करणाऱ्या व्यक्तीला असलेले त्या भाषेचे अपुरे ज्ञान.
- विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीविषयीच्या माहितीचा अभाव आणि त्याविषयीची उदासीनता.
- योग्य अध्यापनशास्त्राचा (पेडोगोजी) अभाव
- मुलांच्या परिचयाची (घराची आणि परिसराची) भाषा आणि शाळेची भाषा यांमधली तफावत.
- या तफावतीकडे संसाधन म्हणून न पाहता केवळ 'अडसर' म्हणून पाहण्याचा संकुचित दृष्टिकोन.
- औपचारिक शिक्षणातला भाषिक शुद्धाशुद्धतेचा विचार.
- प्रमाणभाषेच्या शुद्धतेचा शालेय शिक्षणाच्या सुरुवातीपासून धरला जाणारा अतिरेकी आग्रह.
- राज्यभाषेच्या प्रमाणेतर प्रकारापलीकडे इतर सर्व भाषांकडे तुच्छेतेने पाहण्याची अंगवळणी पडलेली सवय.
- बहुविधतेच्या परिवेशातल्या शाळांकडून धरले जाणारे एकाच प्रकारच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीविषयीचे गृहीतक.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संसोधन व प्रशिक्षण परिषदेने (विद्या परिषद) २०१४ साली प्रसिद्ध केलेल्या राज्य संपादणूक सर्वेक्षणानुसार पाचवीतल्या सुमारे २८ टक्के मुलांची शाळेची भाषा त्यांच्या घराच्या/परिसराच्या भाषेपेक्षा भिन्न होती. अशा परिस्थितीत भाषेविषयी संवेदनशील दृष्टिकोन न बाळगल्यामुळे, योग्य अध्यापनशास्त्राचा अवलंब

न झाल्यामुळे शाळेतली प्रथम भाषा किंवा माध्यम भाषा मुलांना अपेक्षित क्षमतांसह अवगत होण्याची शक्यता कमी होते. शाळेतली प्रथम भाषा धड अवगत न झाल्याचे परिणाम इतर विषय अवगत होण्याच्या क्षमतेवर आणि शक्यतेवर होऊ लागतात. भाषेच्या किमान पातळीअभावी मुले इतर विषयांच्या संपादणुकीत देखील मागे पडू लागतात आणि त्यांचे औपचारिक शिक्षणाकडे दुर्लक्ष सुरू होते. ज्या मुलांच्या परिसरात मराठी खेरीज अन्य भाषा अधिक प्रभावी असतात ती मुले मोठ्या प्रमाणात मराठी भाषेतल्या शिक्षणापासून दुरावू लागतात.

देशाची, राज्याची बहुभाषिक वस्तुस्थिती लक्षात घेता प्रत्येक विद्यार्थ्याला तिच्या/त्याच्या घराच्या किंवा परिसराच्या भाषेतून शिक्षण मिळू शकण्याची शक्यता कमी आहे. शिवाय विविध ऐतिहासिक, सामाजिक आणि राजकीय कारणांमुळे शिक्षणातून उपलब्ध होऊ शकणाऱ्या रोजगाराच्या संधींमध्ये माध्यम भाषानिहाय भिन्नता असू शकते, असे पालक मानतात. त्यामुळे अनेक पालक मातृभाषेखेरीज इतर 'रोजगार मिळवून देणारी' भाषा स्वत:च्या पाल्याच्या शिक्षणाची माध्यमभाषा म्हणून निवडताना दिसतात.

शाळेत दाखल होण्याआधी बहुतांश मुलांना किमान एक भाषा (घराची/परिसराची भाषा) तिच्या व्याकरण नियमांसहित अवगत असते. मात्र तीच भाषा शाळेची माध्यम भाषा नसेल तर शाळेच्या पहिल्या दिवसापासून मुलांना 'अगम्य भाषेतून अगम्य संबोध' शिकण्याच्या त्रासाला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत शिक्षकांनी मुलांच्या परिचयाच्या वातावरणातली उदाहरणे वापरणे, त्यांच्या सवयीच्या घटकांना शाळेतल्या चर्चांमध्ये समाविष्ट करणे आवश्यक असते. मात्र या सर्व प्रयत्नांसोबत शिक्षकांनी अगदी अल्पसा संवाददेखील मुलांना अवगत असलेल्या भाषेतून साधला तर मुलांचे शाळेविषयीचे आकर्षण वाढते, ती उत्सुकतेने शाळेत येऊ लागतात आणि अधिक सहजतेने शिकती होतात, असा अनेक शिक्षकांचा अनुभव आहे. आदिवासीबहुल शाळांमध्ये किंवा सीमावर्ती भागातील शाळांमध्ये काही शिक्षक विशेष प्रयत्न करून मुलांची भाषा अल्प प्रमाणात तरी शिकण्याचा स्तुत्य प्रयत्न करत आहेत. मुलांच्या वर्गातल्या सहभागाविषयीचे त्यांचे अनुभव उत्साहवर्धक आणि उपयुक्त ठरू शकणारे आहेत.

आदिवासी भागातल्या, सीमावर्ती भागातल्या आणि मोठ्या शहरांमधल्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात अमराठी भाषक विद्यार्थी शिकत आहेत. या मुलांना शाळापूर्व आयुष्यात अवगत असणारी (ऱ्या) भाषा मराठीतर असल्यामुळे त्यांचा शाळेतला सहभाग कसा वाढवावा आणि पर्यायाने त्यांच्या संपादणूक पातळीत सुधारणा घडवून आणावी यासाठी शिक्षकांची भूमिका काय असू शकते, मराठी शाळा आणि मराठी भाषक मुले असलेल्या शाळांपेक्षा या शाळांमधल्या शिक्षकांनी कोणते वेगळे प्रयत्न करणे आवश्यक आहे यासाठीच्या काही मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मुलांच्या भाषा शिक्षणाची पातळी वाढली तर त्यांच्या इतर विषयांच्या गुणवत्तेत देखील सुधार होईल, हे लक्षात घेता समाजातल्या बहुभाषिक वातावरणाकडे अडसर म्हणून न पाहता संधी म्हणून पाहायला हवं. शाळेच्या भाषेपेक्षा किंवा संस्कृतीपेक्षा घरची भाषा, घरची संस्कृती भिन्न असेल तर शाळेच्या वातावरणाशी, शाळेच्या भाषेशी जुळवून घेण्याची जबाबदारी मुलांवर ढकलून त्यांच्या 'असमाधानकारक' शैक्षणिक प्रगतीचे उत्तरदायित्व त्यांच्यावर टाकण्याऐवजी शाळांनी या भाषिक, सांस्कृतिक बहुविधतेविषयी अधिकाधिक संवेदनशील होणे गरजेचे आहे, हा दृष्टिकोन ठेवून या मार्गदर्शक सूचनांची निर्मिती करण्यात आली आहे. बहुभाषिक वातावरणात भाषा शिक्षणाचे नवनवे मार्ग शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांना या सूचना उपयुक्त ठरू शकतात.

या प्रयत्नाचा एक भाग म्हणून विद्या परिषदेने बहुभाषक वर्गांमध्ये निरनिराळे प्रयोग करणारे शिक्षक व शाळांचे प्रतिनिधी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट), काही तज्ज्ञ साधन व्यक्ती, विद्या परिषदेतील अधिकारी, मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण या सर्वांना एकमेकांच्या प्रयत्नांच्या माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी, बहुभाषिक परिस्थितीकडे संधी म्हणून पाहण्याच्या दृष्टीने काय करता येईल याचा विचार करण्यासाठी, दि. १२-१३ फेब्रुवारी २०१६ दरम्यान मुंबईमध्ये एक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेतील विचारविनिमयाचा आढावा घेऊन या मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांचा विचार खालील मुद्द्यांच्या आधारे केलेला आहे.

# १ बहुभाषिक वर्गाविषयीचे पालक आणि समाजामध्ये असणारे समज आणि त्यांची मते

जन्मापासून मुले घर आणि परिसरातून जी भाषा निसर्गत: आत्मसात करतात ती भाषा जर शिक्षणाचे माध्यम ठरली तर शिक्षणाच्या गुणवततेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात नियंत्रित होण्याची शक्यता आहे. मात्र भाषिक वैविध्यासहित काही कारणांमुळे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या/तिच्या निसर्गत: परिचित भाषेतून शिक्षण मिळत नाही. ज्या ठिकाणी परिचित भाषेतून शिक्षण मिळण्याची शक्यता असते (उदा. महाराष्ट्रात मराठीतून शिक्षण) तिथे अनेकदा शिक्षणाची माध्यम भाषा निवडताना पालक भविष्यकालीन उपयुक्ततेचा विचार करून माध्यम भाषा निवडतात. ज्या कारणांसाठी शहरी, मराठी पालकवर्ग इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वळतो त्याच कारणांसाठी आदिवासी भाषक पालक मराठी माध्यमांच्या शाळांची मागणी करताना दिसतात. या आधी राज्य पातळीवर 'आदिभारती' सारखे जे प्रयोग झाले त्यात आदिवासी भाषक मुलांना (कोलामी, माडिया गोंडी, भिली, वारली) त्यांच्याच भाषेतली, मराठीप्रमाणे नागरी लिपीत छापलेली पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली होती. मात्र त्या प्रयोगाला आदिवासी भाषक पालकांचा विरोध झाला होता. तो प्रयोग म्हणजे आदिवासी मुलांना केवळ आदिवासी भाषांमध्ये बंदिस्त करून ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे आरोप करण्यात आले होते. इतरही काही अभ्यासांमधूनही पालकांनी आपल्या परिसरातल्या किंवा घरातल्या भाषेपेक्षा राज्याच्या भाषेला प्राधान्य दिल्याचे दिसले आहे.

दुसऱ्या बाजूला महाराष्ट्रातल्या सीमावर्ती भागात ज्या अल्पसंख्य भाषा (उदा. कन्नड, गुजराती, इत्यादी) राज्यघटनेतल्या आठव्या अनुसूचित समाविष्ट आहेत त्या भाषा बोलणारे पालक त्याच भाषांना प्राधान्य देण्याची मागणी करू शकतात कारण त्या भाषांमधून इतर राज्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. अशा भागांमध्ये त्या त्या माध्यमांच्या शाळा उपलब्ध करून देणे हे मोठे आव्हान आहे.

थोडक्यात सांगायचे तर शालेय भाषेचे माध्यम निवडताना मुलांच्या भावी आयुष्याचा विचार केल्याचा पालकांचा दावा असतो. अशा वेळी एखादी गोष्ट केवळ अध्यापनशास्त्रीय दृष्ट्या योग्य आहे किंवा नाही या निवाड्यावर पालकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न अपुरा ठरू शकतो. मुलांनी त्यांना अजिबात परिचित नसलेल्या किंवा अल्प परिचित असलेल्या भाषेतून शिक्षण घेण्याला अध्यापनशास्त्राची परवानगी नसली तरी तो पालकांचा आग्रह आहे हे दुर्लक्षून चालणार नाही. म्हणून परिचित भाषेच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाच्या माध्यम भाषेकडे नेण्याचा प्रयत्न व्हायला हवा. शिक्षकांनी यासाठी पालकांना विश्वासात घ्यायला हवे.

## शिक्षक काय करू शकतात?

- शक्यतो मुलांना परिचित असलेल्या भाषेपासून सुरुवात करावी.
- त्यासाठी ती भाषा काही प्रमाणात आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा.
- आकलनासाठी आणि शाळेविषयी आत्मीयता निर्माण होण्यासाठी मुलांची स्वत:ची भाषा शाळेत वापरली जाणे महत्त्वाचे आहे, हे पालकांना समजावून सांगावे.
- 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' मध्ये सांगितल्याप्रमाणे घटनेतील मूल्यांच्या चौकटीत स्थानिक संस्कृतींची जोपासना शाळेकडून केली जाते, हे पालकांना पटवून द्यावे. त्यासाठी अभ्यासक्रम आणि अभ्यासाक्रमेतर कार्यक्रमांमध्ये योग्य किंवा पूरक अशा स्थानिक गोष्टींचा समावेश करावा.
- सुरुवात मुलांना परिचित भाषेतून होणार असली तरी त्यांच्या अध्यापनाचे उद्दिष्ट शाळेच्या माध्यम भाषेकडे जाणारेच आहे हे पालकाना, शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना काळजीपूर्वक समजावून द्यावे.

- शाळेतील शैक्षणिक वातावरण, विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या भाषेचा शाळेतला वापर या सर्वांचे उद्दिष्ट गुणवत्तापूर्ण शिक्षण आहे, अशा प्रकारची चर्चा पालकांसोबत करावी.
- उपलब्ध असल्यास स्थानिक भाषांमधील साहित्य, पुस्तके, गाणी इत्यादीचा समावेश शाळेतल्या ग्रंथालयात करावा. केवळ पुस्तकेच नव्हे तर दृकश्राव्य साहित्याचा वापर करावा.
- असे साहित्य तयार नसेल किंवा सहज उपलब्ध नसेल तर गावातल्या जाणकारांच्या मदतीने हस्तलिखित स्वरूपात, मोबाईल वरील चित्रणाच्या स्वरूपात जमवत राहावे.
- कोणत्याही परिस्थितीत मुलांना शाळेच्या माध्यम भाषेकडे नेले जाणार आहे, घरची भाषा वापरण्याचा उद्देश मुलांना थेट अपरिचित भाषेचा अशैक्षणिक धक्का न देणे हा असल्याचे पालकांना समजावून सांगावे. घरच्या भाषेचा वापर शाळेत मुबलक प्रमाणात होऊ लागला तर शाळा मुलांसाठी आवडीच्या ठरतील. पण काही भागांतील पालकांचा याबाबत गैरसमज होण्याची आणि राज्यभाषा शिक्षणाचा रास्त आग्रह असण्याची शक्यता आहे, म्हणून ही काळजी घ्यावी.






# २ बहुभाषिक वर्गांविषयी शिक्षकांमध्ये संवेदनशील दृष्टिकोन वृद्धिंगत करणे – आव्हाने आणि शक्यता

देशातल्या शाळाशाळांमधून आढळणाऱ्या बहुभाषिक वर्गांमध्ये सगळी मुले शिकती न होण्याची महत्त्वाची दोन कारणे म्हणजे बहुभाषिक परिस्थितीविषयीची संस्थात्मक अनभिज्ञता आणि असंवेदनशीलता. ही संस्थात्मक अनभिज्ञता आणि असंवेदनशीलता शिक्षकांच्या माध्यमातून शाळाशाळांपर्यंत पोहोचते. शाळेची माध्यम भाषा आणि घरची किंवा परिसराची भाषा भिन्न असतात तेव्हा या असंवेदनशीलतेचा परिणाम मुलांच्या सहभागाच्या पातळीवर होतो. कधी कधी तर ही असंवेदनशीलता इतकी टोकाला जाते की 'स्वतःची भाषा बोलणे' या मूलभूत बालहक्काची गळचेपी केली जाते. उदाहरणार्थ, इंग्रजी माध्यमांच्या अनेक शाळा त्यांच्या आवारात इंग्रजीतर भाषांमधून अनौपचारिक संवादावर देखील बंदी घालतात. असा 'गुन्हा' वारंवार केला तर दंड आकारणे, वर्गाबाहेर उभे करणे अशा स्वरूपाच्या शिक्षा केल्या जातात. शाळेच्या धाकाने पालकही या प्रकारांना मूक संमती देतात आणि मुलांच्या उत्स्फूर्त आणि सर्जनशील अभिव्यक्तीला मोठा अडसर निर्माण होतो.

ही परिस्थिती पालटवण्याची सर्वाधिक क्षमता आणि शक्यता शिक्षकांकडे आहे. वर्गातील बहुभाषिकतेकडे संवेदनशीलपणे पाहणे, मुलांना अवगत असलेल्या भाषेचा जाणीवपूर्वक आदर करणे, मुलांच्या सर्व प्रकारच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहित करणे ही कामे शिक्षकांच्या सवयीचा भाग बनायाला हवीत. प्रत्येक मुलाचा वर्गातला सहभाग ही गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पूर्वअट आहे हे लक्षात घेऊन शिक्षकांना बहुभाषिक वर्गांचे नियोजन करावे लागेल. भाषांमधली भिन्नता ही जर मुलांच्या वर्गसहाभागातली सर्वात मोठी अडचण असेल तर त्यावर तातडीने उपाययोजना करण्याला प्राध्यान्य दिले जावे.

## शिक्षक काय करू शकतात?

- मुलांच्या भाषा अवगत व्हाव्यात म्हणून परिसरातील द्विभाषिक प्रौढांची मदत घ्यावी. शाळेच्या परिसरात लोकसंपर्क वाढवावा.
- मुलांना त्यांच्या घरच्या भाषेत, घरची आणि माध्यम भाषा अशा मिश्र भाषेत व्यक्त होण्यास प्रोत्साहित करावे. लेखी अभिव्यक्तीतही असे भाषांचे मिश्रण होत असेल तर मुलं निरुत्साही होतील अशा पद्धतीने त्यांना 'चूक' ठरवू नये.
- मोबाईलसारख्या साधनांच्या माध्यमातून समान परिस्थितीतील इतर शिक्षकांशी सातत्याने संपर्क ठेवावा, चर्चा करावी.
- शाळेच्या माध्यम भाषेसाठीचे खेळ अनेक शिक्षक घेतात. तशाच प्रकारचे स्थानिक भाषेसाठीचे खेळ विद्यार्थ्यांच्या, पालकांच्या मदतीने विकसित करावेत. अशा खेळांत विद्यार्थ्यांप्रमाणे स्वतः सहभागी व्हावे.
- माध्यम भाषेतर भाषांमधील उपलब्ध साहित्य (शब्दांच्या याद्या, शब्दकोश, वाक्यकोश, अनुवादित कथा, इत्यादी) हस्तगत करून स्वतःसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी त्याचा वापर करावा. (सध्या उपलब्ध असलेल्या अशा प्रकारच्या साहित्यासाठी परिशिष्ट पहा.)
- परिसरातील इतर शाळांमधल्या शिक्षकांशी संपर्क साधून गटसंमेलनासारख्या आदानप्रदानाच्या संधी अशा प्रकारची भाषिक समृद्धी वाढवण्यासाठी वापराव्यात.
- वर्गात प्रत्येकाला स्वतःचे विचार, भावना, अनुभव, गोष्टी, कल्पना आणि परीसराविषयीचे मत मांडण्याची समान संधी मिळणे गरजेचे आहे, हा विचार मनाशी ठेऊन अध्ययन अनुभवांची आखणी आणि रचना करावी.
- बहुभाषिक वर्गातल्या अध्यापन पद्धतींविषयी प्रशिक्षणाची मागणी डाएट किंवा गट शिक्षणाधिकारी आदी योग्य प्राधिकाऱ्यांमार्फत 'विद्या परिषदे'कडे नोंदवावी. पी. एस. एम. मध्ये म्हटल्याप्रमाणे शिक्षकांना आता त्यांच्या मागणीनुसार प्रशिक्षण दिले जाणार आहे.
- शिक्षकांना विद्यार्थ्यांची भाषा अगदी अल्प प्रमाणात येत असली आणि त्यांनी ती वर्गात वापरली तरी ती भाषा जाणणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्या शिक्षकांबद्दल आपुलकी निर्माण होते आणि ते पर्यायाने शिक्षणाशी जोडले जातात.

# ३ शाळेतील सुरुवातीची दोन वर्षे आणि बहुभाषिकता

शाळेची माध्यमभाषा मुलांच्या परिचयाच्या भाषेपेक्षा भिन्न असेल तर सर्वाधिक अडचण शिक्षणाच्या सुरुवातीला, विशेषत: पहिली-दुसरीमध्ये येते. अशा परिस्थितीत मुलाना शाळेत काय चालू आहे याचा अर्थ लावणं, हेच मोठं कठीण काम होऊन बसतं. शिक्षक काय बोलतायत हे न समजल्यामुळं मुलांची केवळ शैक्षणिक प्रगती मंदावते असं नाही तर मुलांचा शाळेप्रती असणारा (संभाव्य) ओढा कमी होतो, त्यांना शाळा नीरस किंवा कांटाळवाणी वाटू लागते. शाळेत आपण जबरदस्तीने जातोय ही भावना त्यांच्यात बळावते आणि परिस्थिती अशीच राहिली तर ती शालाबाह्य होऊ शकतात किंवा शाळेत राहूनही शिकेनाशी होतात. ही पार्श्वभूमी लक्षात घेता शाळेचा सुरुवातीचा काही काळ तरी मुलांना भाषाभिन्नतेमुळे शाळेबद्धल अप्रीती निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेणे गरजेचे ठरते.

## शिक्षक काय करू शकतात?


- दैनंदिन वापरातील काही वाक्ये मुलांच्या भाषेत माहिती करून घेऊन ती वापरावीत. अशा संवादांचे अनेक भाषांमधले नमुने उपलब्ध आहेत (परिशिष्ट पहा). 'काल घरी काय केलं?', 'सगळ्यांनी गोलात बसून घ्या', 'चला आता आपण मैदानावर जाऊ या', 'झाडाला पाणी कोण घालेल?', 'भूक लागली की नाही, चला मग खिचडी खायला', 'फळ्याकडे नीट लक्ष द्या', 'भिंतीवर खडूने चित्रे काढा', इत्यादी. शिक्षक स्वत:च्या दैनंदिन संवादाकडे थोडे काळजीपूर्वक पाहून त्यांना आवश्यक त्या वाक्यांची यादी बनवून परिसरातील त्या-त्या भाषा बोलणाऱ्या प्रौढांच्या मदतीने अशी वाक्ये उच्चारांसहित जाणून घेऊ शकतात.
- अक्षरओळख करून देताना थेट शाळेच्या माध्यम भाषेतले शब्द न वापरता मुलांच्या परिचयाच्या भाषेतले, त्यांच्या परिचयाचे शब्द वापरले तर ध्वनी-अक्षर सहसंबंध समजण्यास मोठी मदत मिळते.

> उदाहरणार्थ, कन्नडभाषक मुलं मोठ्या संख्येने असलेल्या एखाद्या शाळेत 'क' हे अक्षर शिकवण्यासाठी शिक्षक मुलांना 'क' पासून सुरू होणाऱ्या वस्तूंची, अवयवांची, परिसरातील प्राणी-पक्ष्यांची नावे सांगू शकतात. एका शाळेमधल्या मुलांनी जे जे शब्द सांगितले त्यांची शिक्षकांनी फळ्यावर लिहिलेली ही यादी पहा.
>
> कै, काल, कुत्रा, कण्णु, केरसुणी, किरी, किवी, कावळा, कन्नडी, कोणे, केसुरा, केळी, काम, कापूर
>
> यापैकी कै (हात), काल (पाय), कण्णु (डोळे), किरि (लहान), किवी (कान), कन्नडी (आरसा), कोणे (खोली), केसुरा (चिखल) हे शब्द कन्नड भाषेतील आहेत. फळ्यावर लिहिताना शिक्षक केवळ ते शब्द लिहितील, कंसातील अर्थ नाही. कारण इथे उद्दिष्ट 'क' या अक्षराची ओळख व्हावी असा आहे. अशा वेळी वर्गातली कन्नड भाषिक मुले इतरांना त्या शब्दांचे अर्थ सांगू शकतील आणि शिक्षक प्रत्येक शब्दाचा स्पष्ट उच्चार करीत त्यांतील 'क' या अक्षराला अधोरेखित करत राहतील. अशा प्रकारे मुलांच्या परिचित शब्दांसोबत असलेला लिपीचा संबंध दाखवता येईल. कंसात अर्थ लिहून जर शब्द लिहिले तर गोंधळ निर्माण होऊ शकतो. उद्दिष्ट जर लिपीचा परिचय करून देणे असे असेल तर शब्द कोणत्याही भाषेतील चालू शकतील. किंबहुना, आपल्या भाषेतल्या शब्दांना केवळ ध्वनी नाही तर ते लिपीबद्ध करता येतात ही गोष्ट मुलांसाठी आत्मविश्वास वाढवणारी ठरू शकेल.


- एखाद्या वस्तूसाठी भिन्न भाषांमध्ये असणारे भिन्न शब्द त्या वस्तूसोबत मांडून सर्वांना ठळकपणे दिसतील असे ठेवावेत. उदाहरणार्थ : पाण्याच्या ग्लासाचे चित्र काढून त्याच्या सोबत पाणी, पाणी, नीरु असे शब्द लिहून ठेवता येतील. यातील पाणी (मराठी), पानी (हिंदी) किंवा नीरु (कन्नड) शब्द त्या त्या भाषेच्या मुलांच्या परिचयाचे आहेत. असे लेखी शब्द सतत नजरेसमोर राहिले, शिक्षकांकडून जाणीवपूर्वक वाचले गेले तर परिचित शब्दांतून लिपीचा परिचय होऊ शकतो.

- मुलांना स्वत:च्या भाषेत व्यक्त होण्याची संधी अवश्य द्यावी. यामुळे मुलांचा इतरांशी बोलण्याचा, संवाद साधण्याचा सराव होत राहतो.
- शिक्षकांनी मुलांच्या भाषेतले काही शब्द माहिती करून घेऊन त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करावा. अशा वेळी शिक्षकांकडून 'चुका' झाल्या तर विद्यार्थी त्यांना 'शिकवतात'. या प्रक्रियेतून शिक्षकांची विद्यार्थ्यांशी जवळीक वाढतेच. शिवाय शिक्षकांच्या भाषा अध्ययनाची सुरुवात होऊ शकते.
- एका भाषेतील गाणी दुसऱ्या भाषेत भाषांतरित करून वर्गात वापरावीत. यासाठी परिसरातील त्या भाषा जाणणाऱ्या प्रौढांची मदत घेता येईल.
- प्रश्नपत्रिका करतानाही मुलांच्या भाषेचा उपयोग करावा.



# महाराष्ट्र राज्यातील जिल्हानिहाय बोलीभाषा



# ४ सीमाभाग आणि मोठ्या शहरांमधील वर्गांमधील बहुभाषिकता

आदिवासी बहुल पट्ट्यांमध्ये असणारे बहुभाषिक वर्ग आणि मोठ्या शहरांमध्ये असणारे बहुभाषिक वर्ग यांमधला मूलभूत फरक त्यातल्या विद्यार्थ्यांच्या परिचयाच्या भाषांचा आहे. मुंबई किंवा नागपूरसारख्या मोठ्या शहरात येणारे स्थलांतरित मजूर, कामगार किंवा इतर वर्गातील लोकांची भाषा अनेकदा राज्यघटनेतल्या आठव्या अनुसूचीतील भाषांपैकी एक असते, उदाहरणार्थ कन्नड, तामिळ, गुजराती, हिंदी इत्यादी. अशा बहुतेक भाषांमध्ये त्या त्या राज्यांमध्ये शिक्षण, बालसाहित्य उपलब्ध आहे. इंटरनेटसारख्या माध्यमातून या भाषांमधील दृकश्राव्य स्रोत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होऊ शकतात. अशा विद्यार्थ्यांचा वर्गातला सहभाग वाढावा म्हणून प्रयत्न केले जाणे गरजेचे आहे. अर्थात मोठ्या शहरांमधल्या अशा स्थलांतरित मुलांमध्ये राज्यघटनेच्या आठव्या अनुसूची बाहेरच्या म्हणजे आदिवासी किंवा इतर भाषिक अल्पसंख्य समुदायांच्या भाषा बोलणारी मुलेदेखील असू शकतील हे विसरता कामा नये. मात्र सांगली जिल्ह्यात जत किंवा सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोटसारख्या भागांत कन्नड भाषिक मुलांचे प्रमाण अधिक आहे. अशा परिस्थितीतील शिक्षकांची भूमिका वरील मुद्दा क्र. २ मधील भूमिकेपेक्षा थोडी वेगळी असेल.

## शिक्षक काय करू शकतात?

- मुद्दा क्र. २ मधील 'शिक्षकांनी काय करावे?' या भागातील जवळपास सर्व मुद्दे या परिस्थितीतही लागू होतात.
- याशिवाय, अनुसूचित भाषांमधील दृक-श्राव्य शिक्षण साधने मिळवावीत. अशी साधने इंटरनेटसारख्या स्रोतांवर मुबलक प्रमाणात उपलब्ध आहेत.
- सीमावर्ती भाषांमधले बालसाहित्य काही प्रमाणात भाषांतरित स्वरूपात उपलब्ध आहे. असे बालसाहित्य गाणी, कथा इत्यादी प्रकार शाळांमध्ये वापरावेत. त्याच कथा मुलांना त्यांच्या भाषेत सांगायला प्रोत्साहन द्यावे.
- कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील 'सृजन प्राथमिक विद्यालय' या मराठी माध्यमाच्या शाळेत भोजपुरी, कन्नड, बंगाली, मराठी अशा विविध भाषा बोलणारे विद्यार्थी आहेत. या शाळेत या सर्व मुलांना त्यांच्या भाषेत बोलण्याची संधी आवर्जून दिली जाते. उदाहरणार्थ, मुलांना पाणी प्यायचे असेल तर ती काय बोलतात?

**बाई, मी पाणी प्यायला जाते.(मराठी)**
**मॅडम, हम पानी पिये जाईका.(भोजपुरी)**
**बाई, नीराकुडाक होल्यांनू. (कानडी)**
**मॅडम, मु पानी पीयबू. (बंगाली)**

अशा वाक्यपट्ट्या वर्गात लावून मुलांना वहीमध्ये लिहायला लावून शाळेची माध्यमभाषा आणि एकमेकांच्या भाषा शिकायला प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थ्यांना आपापल्या भाषेतून संवाद साधायला लावून शिक्षक काळजीपूर्वक ते ऐकतात, त्याची टिपणे घेतात आणि त्या भाषा शिकण्याचा प्रयत्न देखील करतात. या प्रक्रियेतून मुलं स्वअभिव्यक्तीबाबतीत अधिकाधिक धीट होत चालली आहेत.

या संदर्भातले काही व्हिडिओ
http://onraisingbilingualchildren.com/2016/01/08/supporting-multilingualism-in-schools/
या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सौजन्य : सृजन प्राथमिक विद्यालय, कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड

- कन्नड, गुजराती, तामिळ, इत्यादी अनुसूचित भाषा इतर भाषिकांना शिकवण्यासाठी अनेक व्हिडीओ इंटरनेटवर उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करून शिक्षक आवश्यक त्या भाषांशी थोडा परिचय वाढवू शकतात.
- महाराष्ट्रात मराठी खेरीज कन्नड, गुजराती, सिंधी, तेलगु, हिंदी, उर्दू आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळा आहेत. या सर्व माध्यमांसाठी 'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ' म्हणजेच 'बालभारती' कडून पाठ्यपुस्तके प्रकाशित केली जातात. त्या पुस्तकांचादेखील गरजानुरूप वापर केला जाऊ शकतो.




**बाजाराला जाऊ**

**चांदणी आली**

**झाडंच झाडं**

**साप... साप...!**

**काय आवडतं?**

**आमचं घर**

**लहानी**

**करडी**

**माझं गाव**

**भाकरी फुगली**

# ५ अध्यापन साहित्य म्हणून विविध साधनांचा वापर

वर्गातल्या बऱ्याच मुलांची घराची भाषा आणि शाळेची माध्यम भाषा भिन्न असल्यामुळे शाळा सर्वसमावेशक होण्याची शक्यता कमी होते. 'विद्या परिषदे' ने २०१२ साली प्रकाशित केलेल्या अभ्यासक्रमात सर्वसमावेशकतेला महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. घरची भाषा आणि शाळेची माध्यम भाषा यांच्या फरकामुळे 'निर्माण होणारे प्रश्न कमी करण्यासाठी आणि मुलांच्या अस्मितेचा मान राखण्यासाठी' अध्ययन अनुभवात मुलांच्या भाषांना महत्त्व दिल्याचे म्हटले आहे. (संदर्भ : अभ्यासक्रम २०१२, मराठी प्रथम भाषा, विभाग १.४) सहाजिकच असे अनुभव देण्यासाठी केवळ पाठ्यपुस्तकावर विसंबून चालणार नाही. आपल्यासारखी विविधता आणि विषमता असलेल्या समाजात सर्वसमावेशक असं एकच पुस्तक बनवणं अशक्य आहे. म्हणून भाषिक समावेशकतेसाठी विविध प्रकारचे अध्यापन साहित्य वापरणे क्रमप्राप्त आहे.

यासाठी पाठ्यपुस्तकांखेरीज उपलब्ध साहित्य कुशल वापर करावा लागेल. मराठी आणि मराठीतर भाषांमध्ये उपलब्ध असलेल्या शैक्षणिक साहित्याची (एक अपूर्ण) यादी परिशिष्टात दिलेली आहे. यातले बरेचसे साहित्य विद्या परिषद, विविध डाएट, काही शिक्षक आणि अधिकारी, स्वयंसेवी संस्था यांनी तयार केलेले आहे. मराठी आणि कोरकू, मराठी आणि गोंडी, मराठी आणि वारली, मराठी आणि भिली असे आदिवासी भाषा आणि मराठी अशा प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे. कन्नड आणि गुजराती सारख्या अधिक प्रगत भाषांमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य उपलब्ध आहे.

### द्विभाषिक पुस्तक असे वापरावे

पुस्तक वाचून दाखवताना बोली भाषेतील वाक्य वा शब्द वाचून लगोलग त्याचा मराठीतील अनुवाद वाचून दाखवणे महत्त्वाचे आहे. वाचून दाखवताना, विशेषतः बोली मजकुरावरून शिक्षकाने बोट फिरवावे. 'उच्चारलेले' आणि 'लिहिलेले' यांच्यातील संबंध मुलांच्या मनात ठसायला याची मदत होते.

पुस्तकातील चित्रे दाखवून मराठीतील मजकूर वाचून दाखवल्यावर लगेच मुलांच्या मातृभाषेतील मजकूर वाचून दाखवावा. हे लागोपाठ होणे, म्हणजेच या दोन्हीच्या मध्ये इतर काही न बोलणे महत्त्वाचे. आपली भाषा आणि मराठी यातील आशय अशाप्रकारे ऐकायला मिळाला, की मातृभाषेमुळे जो आशय समजतो त्या आशयाशी संबंधित मराठीतील शब्द, वाक्यरचना मुलांच्या कानावरून जातात. मराठी उच्चार, आघात यांना मुलांचे कान सरावतात, तसेच हळूहळू मुलांना त्यांचा अर्थ समजायला लागतो.

परिचित आशयासाठी आपल्या भाषेतल्या शब्दांना, वाक्यांना असलेले मराठीतले पर्याय कानावरून गेले, की मुले आणि मराठी यातील अंतर कमी व्हायला मदत होते. आपल्या भाषेसारखीच आणखी एक भाषा आहे याची जाणीव मुलांच्या मनात सहजपणे आकारते.

आपल्या भाषेत आपण बोलतो ते कागदावर उमटलेले दिसले कि मुलांच्या मनात 'बोललेले आणि लिहिलेले', 'ध्वनी आणि अक्षर' यातील घनिष्ट संबधाची जाण विकसित व्हायला मदत होते. लिपी शिकताना हि जाण विकसित होणे फार महत्त्वाचे असते.

मराठी पाठ्यपुस्तकानुसार अक्षरओळख करून देताना, ते विशिष्ट अक्षर असलेले बोली भाषेतील शब्द आवर्जून फळ्यावर लिहून दाखवावे. मुलांनी त्या अक्षरासाठी बोली भाषेतील आणखी शब्द सांगितले तर तेही फळ्यावर लिहावे.

वाचता येणाऱ्या मोठ्या मुलांसाठी बोली भाषेतील आणि प्रमाण मराठीतील वाक्यांच्या पट्या तयार करून त्यांच्या जोड्या लावायला देता येतील.

- वर्षा सहस्रबुद्धे

## ९.१ शिक्षणातील द्विभाषिक गोष्टींच्या पुस्तकांची भूमिका :

लहान मुलांच्या शिक्षणात गोष्टींचे मोठे महत्त्व आहे. कथा हा प्रकार मुलांचे मनोरंजन करतोच, शिवाय त्यामुळे मुले स्वतःच्या भाषेतून कल्पना करायला, त्या मांडायला शिकतात. प्रसिद्ध बालशिक्षण तज्ज्ञ अनुताई वाघ तर बालकथांना आणि गीतांना मुलांच्या भाषा शिक्षणात सर्वाधिक महत्त्वाचे स्थान देतात. मराठीतर भाषिक मुलांसाठी छोट्याछोट्या कथांची मराठी-गोंडी, मराठी-ठाकरी इत्यादी द्विभाषिक पुस्तके बनवली तर ती मुलांसाठी आकलनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरतात.


मुलांसाठी दोन प्रकारची पुस्तके अधिक उपयुक्त ठरतात. परिचित भाषेतून परिचित किंवा अपरिचित संस्कृतीचा अनुभव देणारी पुस्तके. भाषा अपरिचित असतांना त्यातले संदर्भ परिचित असले तरी काही प्रमाणात मुले त्या पुस्तकाशी जवळीक साधू शकतात. पण बहुतेक वेळा अमराठी भाषक मुलांना अपरिचित भाषेतून अपरिचित सांस्कृतिक जगाचे दर्शन घडवले जाते. भाषा आणि संस्कृती दोन्हीही फार काही माहितीतल्या नसतील तर सहाजिकच मुले शिक्षणाकडे दुर्लक्ष करू लागतात. अशावेळी त्या त्या भागातल्या मुलांना परिचित वातावरणाविषयीच्या गोष्टी परिचित आणि माध्यम भाषेतून मुलांपर्यंत पोहोचल्या तर त्या फार उपयुक्त ठरू शकतात. एकाच पुस्तकात एकाच पानावर एकाचा चित्राविषयी १-२ ओळी माध्यमभाषेतून आणि त्याच ओळी स्थानिक भाषेतून (आणि बहुतेक वेळा नागरी लिपीतून) असतील अशा द्विभाषिक पुस्तकांचा उपयोग मुलांच्या आकलनाला गती देणारा ठरतो.

## ९.२ शाळेच्या माध्यम भाषेतून स्थानिक संदर्भ वापरून केलेल्या वाचन साहित्याचा वापर :

वर उल्लेखिल्याप्रमाणे मुले जसजशी वरच्या वर्गामध्ये जाऊ लागतील तसतसे त्यांच्यासोबत अधिकाधिक प्रमाणात शाळेच्या माध्यम भाषेचा वापर करणे त्यांच्या शाळेच्या माध्यम भाषेकडे संक्रमणाच्या दृष्टीने हितकारक ठरते. मात्र हे करत असतांना भाषा फारशी परिचित नसल्यामुळे किमान वाचन साहित्यातले संदर्भ परिचयाचे असणे योग्य ठरते. असे (सचित्र) साहित्य मिळाले तर मुले वाचण्याचा प्रयत्न करतील अन्यथा पुरेशा आकलनाअभावी ती माध्यम भाषा शिकण्याच्या सुरुवातीच्या टप्प्यातच गळपटून जाऊ शकतात, म्हणून अपरिचित भाषा आणि परिचित संदर्भ हे सूत्र उपयुक्त ठरते.

## ५.३ आदिवासी लोकसाहित्याचा भाषाशिक्षणातील वापर– शक्यता आणि आव्हाने :

आदिवासी समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक गीते, गाणी, म्हणी, कथा, कविता, नृत्य, चित्रकला असे विविधांगी साहित्य आणि कलाप्रकार उपलब्ध आहेत. त्यापैकी बरेचसे साहित्य मौखिक परंपरांमधून चालत आलेले आहेत. त्यांची पुस्तके किंवा छापील स्वरूपातील उपलब्धता कमी आहे. पण त्या त्या भागातल्या आदिवासी घराघरांमधून सापडणारे साहित्य आणि कलाप्रकार तिथल्या मुलांना शाळेशी जोडण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. म्हणून स्थानिक साहित्य आणि कलांचा वापर काही प्रमाणात अनिवार्य ठरतो. मात्र असा वापर करतांना एक काळजी घ्यायला हवी. आदिवासी असो की बिगर आदिवासी, सगळेच पारंपरिक साहित्य किंवा कलाप्रकार शाळांमध्ये वापरण्यायोग्य असतीलच असे नाही. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' मध्ये देखील असे साहित्य आणि परंपरांमधले विहित ज्ञान घटनात्मक मूल्यांच्या चौकटीत पारखून शाळाशाळांमधून वापरले जावे. केवळ स्थानिक आणि उपयुक्त म्हणून योग्य असे ठरवून चालणार नाही.




### शिक्षक काय करू शकतात?

- मुलांसाठी द्विभाषिक पुस्तके जमवणे आणि त्यांचे वाचन घडवून आणणे.
- आपल्या गरजेच्या भाषेत अशी पुस्तके नसतील तर परिसरातील प्रौढांच्या मदतीने अशी पुस्तके हस्तलिखित स्वरूपात किंवा छपाई करून घेऊन तयार करणे.
- मुलांच्या दैनंदिन जीवनाची माहिती, त्यांच्या जीवनातले संदर्भ वापरून कथा आणि प्रसंगलेखन करणे. यासाठी दोन भाषा किंवा माध्यम भाषा वापरता येईल.
- विद्यार्थ्यांच्या, परिसरातील मोठ्या मुलांच्या आणि पालकांच्या मदतीने पारंपरिक गाणी, कथा, कविता, म्हणी, चित्रे यांचा संग्रह करणे.
- वरील साहित्याची शिक्षणातील गाभा घटकांच्या दृष्टीने निवड करणे.
- परिसरातील इतर शिक्षक किंवा डाएट सारख्या संस्थांनी असे काही साहित्य तयार केले असेल तर ते मिळवून संग्रही ठेवणे.
- स्थानिक गाणी, गोष्टी, नृत्यप्रकार, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम यांचे दृकश्राव्य रेकॉर्डिंग मिळवणे, प्रसंगी मोबाईलचा वापर करून स्वतः चित्रण करणे.
- मुलांना त्यांचे अनुभव, त्यांच्या घरातले, परिसरातले, खेळतानाचे प्रसंग, गंमती, गोष्टी, गाणी सांगण्यास प्रोत्साहन देणे. अशा वेळी कुठल्याही एका भाषेचा आग्रह धरू नये.
- विद्यार्थी जर त्यांच्या परिचयाच्या भाषेतून किंवा शिक्षण माध्यमाच्या भाषेतून किंवा दोन्हींचे 'मिश्रण' करून बोलत असतील तरी त्यास मज्जाव करू नये.
- साहित्य मिळवण्यासाठी इंटरनेट व e- content चा वापर करावा.


# ६ बहुभाषिक वर्गात मुलांची लेखी अभिव्यक्ती आणि तिचे मूल्यमापन :

शाळेसारख्या औपचारिक ठिकाणी विद्यार्थी आणि शिक्षक विशिष्ट भाषांतून व्यक्त होत असले तरी जसजसे आपण वरच्या वर्गांकडे जाऊ तसतसे अभिव्यक्तिचा प्रकार क्रमशः अधिकाधिक प्रगल्भ आणि गुंतागुंतीचा होत जातो. लेखनाचे सृजनात्मक अंग वाढत जाणे अपेक्षित असते. थोडक्यात, लेखनकौशल्य हे शालेय पातळीवरच्या अभिव्यक्तीचे एक महत्त्वाचे अंग आहे. शाळेच्या माध्यमभाषेतर भाषांमधली मुले माध्यम भाषेकडे संक्रमित होत असतांना लेखी भाषेविषयी त्यांचा आत्मविश्वास वाढवणे, त्यांचे लेखन प्रगल्भ होण्याजोगे अध्ययनअनुभव त्यांना देणे, वेळोवेळी लेखनाचे मूल्यमापन करून गरज पडल्यास त्यांना आवश्यक ती मदत करणे आणि सूचना देणे अशा कामांची शिक्षकांकडून अपेक्षा आहे. मात्र यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याच्या संपादणुकीनुसार मूल्यमापनाचे निकष विद्यार्थ्यांगणिक बदलत राहून प्रत्येक विद्यार्थी वर्गनिहाय अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचेल (म्हणजे मूल्यमापनाचे अंतिम निकष सर्व विद्यार्थ्यांसाठी सारखे असतील) अशाप्रकारे नियोजन करण्याचे जबाबदारीचे काम शिक्षकांनी करणे गरजेचे असते. यासाठी बहुभाषिक वर्गात शिक्षकांनी मुलांच्या भाषांविषयी अतिशय संवेदनशील दृष्टिकोन बाळगणे ही पूर्वअट ठरते.

लेखनामध्ये 'शुद्धलेखन' आणि केवळ माध्यमभाषेतील शब्दांचा आग्रह धरण्याऐवजी कल्पनाविस्तार, सर्जनशील मांडणीवर भर देण्याची सूचना पी. एस. एम. अंतर्गत झालेल्या पायाभूत चाचणीमध्ये देखील करण्यात आली होती. या दिशेने वाटचाल केली तर विद्यार्थी लेखी भाषेत अभिव्यक्त होण्यात तरबेज होऊ शकतील.

## शिक्षक काय करू शकतात?

- विद्यार्थ्यांच्या अनुभवकथनाचे लेखन त्यांच्याच शब्दात फळ्यावर करावे किंवा कागदावर लिहून वर्गात प्रदर्शनीय होईल असे मांडावे.
- परिसरातील वस्तू दाखवून किंवा प्रसंगांची आठवण करून देऊन त्याविषयी मुक्तलेखन करण्यास प्रोत्साहन द्यावे
- शब्दांवरून किंवा प्रसंगांवरून कथा लेखन करण्यास सांगावे. सोबत समर्पक असे चित्र काढण्यास सांगावे.
- मुलांना मुक्तपणे हवी ती चित्रे काढू द्यावी व नंतर त्या चित्रांची गोष्ट लिहायला सांगावी. अगदी लहान वर्गात अभिव्यक्ती चित्रातून व्हावी. शब्द किंवा प्रसंग शिक्षकांनी देऊ नये.
- विद्यार्थी जर त्यांच्या परिचयाच्या भाषेतून किंवा शिक्षण माध्यमाच्या भाषेतून किंवा दोन्हींचे 'मिश्रण' करून लिहित असतील तरी त्यास मज्जाव करू नये. अनेक वेळा लिहिताना होत असलेला विचारही एका किंवा अधिक भाषांमधून होत असतो हे लक्षात ठेवावे. यासाठी खालील उदाहरण मार्गदर्शक ठरावे.


अनुभवलेखन
भंगारवाला
ढाढरे

अमच्या पाड्यास एक भंगारवाला येतो तो टेंपो घेऊन येतो आणि रस्त्याच्या एका बाजूला टेंपो थांबवतो तो भंगारवाला पाड्यात येतो आणि सगळ्या लोकांना आवाज देतो तो आवाज देतांना भंगार आणा कांदे, बटाटी, लसून साखर, केळी घ्या असाले भंगारवाला आवाज देतो त्याला आपन मोडलेल्या खुर्ची, पत्रे घमेली दिले कि त्यांचे लहान लहान तुकडे करतो आणि त्या तराजूत ठेवतो एका तराजूत आपन त्याला दिलेली वस्तू ठेव आणि एका तराजूत वजन ठेवतो आणि त्या दोघांचे वजन समान करतो. वजन समान केल्यानर आपन दिलेली वस्तू त्यांच्या टेंपोत ठेवतो आणि वजन असते ते त्या तराजूतच ठेवतो त्यांना आपल्याला सांगितले कि तुम्ही दिलेल्या वस्तूचा आणि वजनाचा समान वजन केले आणि वजन तराजूतच ठेवले मग तो सांगतो आता तुम्हाला काय पाहिजेल आपण सांगितले बटाटी द्या की तो लगेच बटाट्याचे वजन करून देतो आणि त्याचे कपडे मात्र थोडे थोडे फाटके असतात तो भंगारवाला हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषा बोलतो.

नाव - प्रमिला रविंद्र पारधी

इयत्ता - दुसरी

किंवा हा दुसरा नमुना पहा. दगड, चिंच, मीठ आणि रोहित या चार शब्दांवरून गोष्ट बनवायला सांगितल्यानंतर एका वारली भाषक विद्यार्थ्याने खालील गोष्ट लिहिली.

एका गावमेहे रोहीत नावाओ पोऱ्यू राहात ओता. त्याचे तिन दोस्त ओता. सुट्टीच्या दिवशी ते एकी जागे चिंच खायला गेले. रोहीतला झाळोपोओ चढता येत नव्हते. त्याचे ते दोस्त चिंच पाडा झाडावर चढले. रोहीतला झाळापोओ चडता आवडीतलो. ते डोगे आवगवल्ये होते. त्याने डोगोणही चिंच पाढले. त्याचे तिन दोस्त झाळोपोओते खाली उतरले.ते चिंच त्यानी ढीग वाल्ये. थोडे चिंच त्यानी तीथे खाल्ये. मग ते कोओ गेले. घरी जाईन त्यांनी मीठबरोबर चिंचा खाल्या.

सौजन्य - क्वेस्ट, सोनाळे, जि. पालघर

'गावामध्ये' किंवा 'गावात' ऐवजी 'गावमेहे', 'नावाचा' ऐवजी 'नावाओ', 'झाडावर' ऐवजी 'झाळापोओ', 'घरी जाऊन' ऐवजी 'घरी जाईन' असे त्याच्या परिचित भाषेतल्या पद्धतीचे शब्द वापरले आहेत. असे मिश्रण करून लिहिलेली मराठी भाषा 'अशुद्ध मानली गेली तर भिन्न भाषिक मुलांची अभिव्यक्ती खुंटते. त्याऐवजी या शब्दांचा, मिश्र भाषेचा स्वीकार करून मुलांना लिहिण्यास प्रोत्साहन दिले तर जसजसा त्यांचा मराठी भाषेचा संपर्क वाढू लागतो, जसजशी त्यांची शब्दसंपत्ती वाढत जाते तसतशी त्यांची अभिव्यक्ती बदलत जाते. शालेय पातळीवर भाषाशिक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांची नैसर्गिक अभिव्यक्ती पुसून टाकून अपरिचित भाषेतून कृत्रिम अभिव्यक्तीला भाग पाडणे असा नाही. विद्यार्थी क्रमशः अधिकाधिक माध्यम भाषेचा वापर करतील असे अध्ययन अनुभव द्यावेत. मात्र त्यांच्या आत्मविश्वासाला, व्यक्त होण्याला अडथळा निर्माण करेल अशी सक्ती करू नये.

- मुलांच्या लेखनातून (त्यात 'सुधारणा' न करता, ते आहे तसे वापरून) शाळेचे हस्तलिखित तयार करावे आणि पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांना ते हस्तलिखित दाखवावे.
- वर्गात एकापेक्षा जास्त परिसर भाषा असणारे विद्यार्थी असतील तर विद्यार्थ्यांचे शब्द स्वीकारत असतांना त्यांना पर्यायी असे माध्यम भाषेतले तसेच वर्गातील इतर मुलांच्या भाषांमधले शब्द सांगावेत, फळ्यावर लिहावेत. अशा कार्डशीट बनवाव्यात. कार्डशीटवर लिहिलेले अधून मधून वाचून दाखवल्यास अधिक परिणामकारक ठरेल.
- विद्यार्थांनी दुसरीनंतर किंवा तिसरीनंतर किवा आठ वर्षांचे झाल्यानंतर किंवा विशिष्ट वयाचे झाल्यानंतर घराच्या भाषेचा वापर पूर्णपणे थांबवून केवळ शाळेच्या माध्यमभाषेचा वापर करावा असा आग्रह धरू नये. याचा अर्थ त्यांनी शाळेची माध्यम भाषा शिकली नाही तरी चालेल असा नाही. मात्र माध्यम भाषेच्या आग्रहामुळे त्यांच्या अध्ययन प्रक्रियेत अडसर निर्माण होणार नाही, याची काळजी घेत भाषिक संक्रमण घडवून आणावे.
- माध्यमभाषेकडे संक्रमण गरजेचे आणि अपेक्षित आहे. मात्र त्याचा वेग विद्यार्थ्यागणिक बदलू शकतो याचा विसर पडू देऊ नये. अशा वेळी 'मागे' पडणाऱ्या विद्यार्थ्यांना कसलीही शिक्षा देऊ नये किंवा अपमानास्पद वागणूक देऊ नये. 'एकच वाक्य पाच-दहा वेळा उतरवून काढ' किंवा 'एकच उतारा पुन्हा पुन्हा उतरव' अशा 'शैक्षणिक' शिक्षा देखील टाळाव्यात.

'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या जी. आर. ने प्रत्येक विद्यार्थ्याच्या संपादणुकीत वाढीची अपेक्षा केली आहे. शाळेतल्या भाषेचा अयोग्य आणि असंवेदनशील अनुभव शैक्षणिक गुणवत्तेवर विपरीत परिणाम करतो. शाळेची माध्यम भाषा आणि विद्यार्थांच्या घरची किंवा परिसराची भाषा भिन्न असतात तेव्हा शिक्षणाच्या सुरुवातीलाच अडथळा निर्माण होण्याची शक्यता असते. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बालकांच्या अधिकाराची पूर्तता व्हायला हवी असेल तर असे अडथळे निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. त्या दृष्टीने या मार्गदर्शक सूचना उपयुक्त ठरतील अशी अपेक्षा आहे.

# परिशिष्ट – उपलब्ध साहित्याची संकीर्ण यादी

मराठी शाळांमध्ये येणाऱ्या अमराठी भाषक मुलांसाठी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षक, स्वयंसेवी संस्था, भाषांचे अभ्यासक, डाएट, विद्यापरिषद यांनी प्रयत्नपूर्वक द्विभाषिक किंवा त्रिभाषिक साहित्य निर्माण केले आहे. या प्रयत्नांचा मुख्य भर मराठी आणि दुसरी एखादी आदिवासी भाषा एकत्र घेऊन साहित्य निर्मिती करण्यावर आहे. यामध्ये मुख्यतः मुद्रित साहित्य आढळते. सध्या तयार असलेले साहित्य अनेक अर्थांनी उपयुक्त आहे. मुलांना एकाच वेळी त्यांची स्वतःची भाषा आणि शाळेची भाषा यांमध्ये कथा, गाणी, कोडी, खेळ, विविध वस्तू, प्राणी, पक्षी, फुले, फळे, इत्यादी नावे उपलब्ध करून देण्याचा चांगला प्रयत्न या साहित्यात झालेला दिसतो. याशिवाय, विशेषतः आदिवासी भागात बाहेरून येणारे शिक्षक हे साहित्य वापरून मुलांशी निश्चितच जवळीक साधू शकतील.

अमराठी भाषक मुलांशी संवाद साधण्यासाठी शिक्षकांना काही प्रमाणात ती भाषा बोलावी लागेल. पण मुद्रित भाषेत बोलण्याची लकब किंवा उच्चारांची पद्धत पकडण्यास मर्यादा येतात. त्यामुळे हे साहित्य विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने मर्यादित स्वरूपात उपयोगी आहे. (आता मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असणाऱ्या मोबाईल फोनसारख्या साधनांमुळे शिक्षक लोकांचे बोलणे ध्वनीमुद्रित करून वापरू शकतात.)

शिक्षकांच्या पातळीवर तयार झालेले साहित्य इतर काही शिक्षकांपर्यंत पोहचू शकते. डाएट किंवा विद्या परिषदेसारख्या संस्थानी तयार केलेले साहित्य आवश्यकतेनुसार जिल्ह्यात किंवा राज्यात सर्वत्र पोहोचू शकते. मात्र सध्या हे सर्व साहित्य विखुरलेले आहे. एका जिल्ह्यातील साहित्य शेजारच्या जिल्ह्यात देखील माहिती असेलच असे नाही. त्यामुळे उपलब्ध साहित्य वापरावर मर्यादा येतात आणि त्याच प्रकारचे साहित्य एकापेक्षा जास्त ठिकाणी तयार होते.

'विद्या परिषदे'च्या प्रयत्नातून सध्या दहा आदिवासी भाषांमधली द्विभाषिक गोष्टींची पुस्तके तयार करण्याचे काम पूर्णत्वाला पोहोचले असून या पुस्तकांच्या प्रती भाषिक गरजांनुसार त्या त्या शाळांना पोहोचवल्या जाणार आहेत.

सध्या तयार असलेल्या साहित्याची खालील यादी अपूर्ण आहे. ही यादी पाहून शिक्षक, डाएट किंवा इतर संस्थांनी आपापल्या साहित्याचे नमुने विद्या परिषदेकडे पाठवावेत. परिषदेच्या संकेतस्थळावर या यादीचे सतत नूतनीकरण होत राहील आणि शिक्षकांना आपापल्या परिस्थितीनुसार वापरण्यासाठीचे साहित्य काही प्रमाणात उपलब्ध होईल.



| क्र. | साहित्याचे नाव | भाषा | प्रकार | थोडक्यात वर्णन | अपेक्षित वाचक |
|---|---|---|---|---|---|
| १ | गीतमाला | कातकरी - मराठी | गाणी | काही मराठी बालागीतांचा कातकरी अनुवाद. सोबत रंगीत चित्रे दिलेली आहेत.<br>प्रकाशक - डॉ. भक्ती उमर्जी,<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड | शिक्षक,<br>विद्यार्थी, पालक |
| २ | छान छान गोष्टी | ठाकरी - मराठी | कथा | पंचतंत्र तसेच काही लोककथा मराठी आणि ठाकरी भाषेत आहेत. सोबत रंगीत चित्रे दिलेली आहेत.<br>प्रकाशक - डॉ. भक्ती उमर्जी,<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड | शिक्षक,<br>विद्यार्थी, पालक |
| ३ | छान छान गोष्टी | कातकरी - मराठी | कथा | पंचतंत्र तसेच काही लोककथा मराठी आणि कातकरी भाषेत आहेत. सोबत रंगीत चित्रे दिलेली आहेत.<br>प्रकाशक - डॉ. भक्ती उमर्जी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड | शिक्षक,<br>विद्यार्थी, पालक |
| ४. | संवादिनी | कातकरी- मराठी | शब्द, वाक्ये संवादपट्ट्या इत्यादी. | शिक्षकांनी मुलांशी संवाद साधाण्यासाठी उपयुक्त कातकरी-मराठी नमुने, दैनंदिन अनुभवातील संवादाचे काही नमुने, विविध प्रकारची वाक्ये, फळे, फुले, पाने, भांडी, इत्यादींची द्विभाषिक नावे.<br>प्रकाशक - डॉ. भक्ती उमर्जी<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड | मुख्यत :<br>शिक्षकांसाठी उपयुक्त.<br>काही भाग विद्यार्थी वापरू शकतात. |
| ५. | संवादिनी | ठाकरी- मराठी | शब्द, वाक्ये संवादपट्ट्या इत्यादी. | शिक्षकांनी मुलांशी संवाद साधाण्यासाठी उपयुक्त ठाकरी - मराठी नमुने, दैनंदिन अनुभवातील संवादाचे काही नमुने, विविध प्रकारची वाक्ये, फळे, फुले, पाने, भांडी, इत्यादींची द्विभाषिक नावे.<br>प्रकाशक - डॉ. भक्ती उमर्जी<br>जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रायगड. | मुख्यत :<br>शिक्षकांसाठी उपयुक्त.<br>काही भाग विद्यार्थी वापरू शकतात. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | इयां माय मांडी<br>(माझी मायबोली) | कोरकू - मराठी इंग्रजी | गाणी, कथा, संवाद आणि पाठ्य-पुस्तकावर आधारित साहित्य | काही गाणी, संवाद, कथा, उतारे, निबंध इत्यादी गोष्टी मराठी आणि कोरकू मध्ये आहेत. याशिवाय वर्ग इ. १ ली व २ री च्या मराठी, गणित आणि इंग्रजीच्या पाठ्यपुस्तकांतले काही पाठ्यांश पुस्तकातल्या चित्रांसह कोरकू, मराठी आणि इंग्रजीमध्ये देण्यात आले आहेत.<br>प्रकाशक - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती | मुख्यत :<br>शिक्षकांसाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. |
| ७. | १. आदिभारती - कोलमी<br>२. आदिभारती - माडिया गोंडी<br>३. आदिभारती - वारली | कोलामी, माडियागोंडी, भिली आणि वारली भाषेसाठी | या चार भाषांच्या पार्श्वभूमीतून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतून औपचारिक शिक्षणासाठी | औपचारिक शिक्षणात नागरी लिपीतील अक्षरओळख करून देण्यासाठी मराठीतर मातृभाषेचा वापर करणारी पुस्तके. सोबत त्या त्या पुस्तकांसाठी शिक्षक हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.<br>प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | विद्यार्थी आणि शिक्षक या दोन्ही घटकांसाठी उपयुक्त |
| | शिक्षकांसाठी संवादपुस्तिका<br>१. गोंडी-मराठी माडियागोंडी<br>२. कोलमी-मराठी | गोंडी, माडियागोंडी आणि कोलामी | दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या संवादांचा संग्रह | दैनंदिन जीवनातील विविध प्रसंगी किंवा विषयानुरूप वापरण्यासाठीच्या संवादांचा आदिवासी भाषा आणि मराठीतील संग्रह. मराठी येणाऱ्या शिक्षकांसाठी उपयुक्त.<br>पकाशक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | शिक्षकांना आदिवासी भाषा शिकण्यासाठी आणि पालक किंवा मुलांना मराठी शिकण्यासाठी उपयुक्त. |
| ८. | १. शिकूया ठाकरी बोलीभाषा<br>२. शिकूया कोकणी बोलीभाषा<br>३. शिकूया कोलामी बोलीभाषा<br>४. शिकूया माडिया बोलीभाषा<br>५. शिकूया पारधी बोलीभाषा<br>६. शिकूया कोरकू बोलीभाषा<br>७. शिकूया हलबी बोलीभाषा<br>८. शिकूया गोंडी बोलीभाषा | मराठी-ठाकरी<br>मराठी-कोकणी<br>मराठी-कोलामी<br>मराठी-माडीया<br>मराठी-पारधी<br>मराठी-कोरकू<br>मराठी-हलबी<br>मराठी-गोंडी<br>संवादसंग्रह | संवादासाठीची वाक्ये, वभक्तीप्रत्यय, लिंग, काळ यांची माहिती | चार महत्त्वाच्या आदिवासी भाषांचा आणि काही प्रमाणात त्यांच्या व्याकरणाचा विचार करणाऱ्या आठ पुस्तिकांचा संग्रह.<br>प्रकाशक - आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे. | मुख्यत :<br>शिक्षकांसाठी उपयुक्त. |

| क्र. | साहित्याचे नाव | भाषा | प्रकार | थोडक्यात वर्णन | अपेक्षित वाचक |
|---|---|---|---|---|---|
| ९. | आमच्या गोष्टी<br>१. बाजाराला जाऊ<br>२. चांदणी आली<br>३. झाडंच झाडं<br>४. साप...साप....!<br>५. काय आवडतं?<br>६. आमचं घर<br>७. लहानी<br>८. करडी<br>९. माझं गाव<br>१०.भाकरी फुगली | मराठी-पावरी<br>मराठी-भिलोरी<br>मराठी-निहाली<br>मराठी-गोंडी<br>मराठी-प्रधानगोंडी<br>मराठी-कातकरी<br>मराठी-कोलामी<br>मराठी-मावची<br>मराठी-वारली<br>मराठी-कोरकू | दैनंदिन अनुभवांशी संबंधित चित्र कथा | आदिवासी समाजातील मुलांच्या अनुभवातील कथा. मराठी आणि पावरी किंवा मराठी आणि भिलोरी अशा द्विभाषिक कथा. नागरी लिपीतून लिहिलेल्या.<br>लेखन - वर्षा सहस्त्रबुद्धे<br>प्रकाशक - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त शिक्षकांनी त्यांच्यासाठी वापरावीत. |
| १०. | द्विभाषिक वाचनसाहित्यमाला<br>१. ओढ्याकाठी<br>२. खेळच खेळ | | | | |
| ११. | त्रैभाषिक शब्दसंग्रह | भिलोरी-पावरी-मराठी | दैनंदिन अनुभवातील वस्तू, फळे, पशु-पक्षी, वाहने तसेच संख्यानामे यांचा संग्रह | विद्यार्थ्यांच्या परिसरातील तसेच पाठ्यपुस्तकातील वस्तू यांचा त्रैभाषिक शब्दसंग्रह. धुळे-नंदुबार भागातल्या भाषांचा विचार करून बनवलेला हा संग्रह शिक्षकांना मुलांशी संवाद साधण्यासाठी आणि मुलांना त्यांच्या भाषेतील वस्तूंची मराठी नावे समजण्यासाठी उपयुक्त. प्रत्येक वस्तूचे चित्र दिलेले असणे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.<br>संपादक : भारती बेलन.<br>प्रकाशक - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे | शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यासाठी उपयुक्त. |
| १२. | त्रैभाषिक वाक्य संग्रह | भिलोरी-पावरी-मराठी | दैनंदिन वापरातील वाक्ये तसेच छोटी-छोटी वर्णने. | दैनंदिन संवादात उपयोगी पडणारी वाक्ये भिलोरी, पावरी आणि मराठी या भाषांमध्ये दिलेली आहेत. शिक्षकांना मुलांशी संवाद साधण्यासाठी उपयुक्त ठरतील अशी वाक्ये आहेत. प्रत्येक वस्तूचे किंवा कृतीचे चित्र दिलेले असणे हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे.<br>संपादक : भारती बेलन.<br>प्रकाशक - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे | शिक्षक आणि विद्यार्थ्यांना उपयोगी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३. | सोबती - शिक्षक हस्तपुस्तिका | पावरी-नोयारी-मराठी | दैनंदिन कामकाजा-विषयी तसेच विषय अध्यापनातील संवादाचे नमुने. | शिक्षकांनी पालक, गावकरी यांच्याशी विविध प्रसंगी कसा संवाद साधावा याचे त्रैभाषिक नमुने. या शिवाय विविध विषय (मराठी, परिसर, गणित, इंग्रजी) अध्यापन करतांना वापरल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या सूचनांचा संग्रह. याशिवाय काही कथांचा मराठीतून पावरीत अनुवाद असणारा हा संग्रह दैनंदिन अध्यापनात अत्यंत उपयुक्त आहे.<br>संपादक : डॉ. विद्या पाटील<br>प्रकाशन - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे | मुख्यत : शिक्षकांसाठी |
| १४. | आदिवासी बोलीभाषा-कोलामी | मराठी-कोलामी-इंग्रजी | दैनंदिन वापरातले संवाद आणि शब्द यांचा संग्रह. | दैनंदिन वापरातील वाक्ये, म्हणी, परिसरातील वस्तू, पदार्थ, अन्नपदार्थ मसाले, शरीराचे अवयव इत्यादींचा कोलामी, मराठी आणि इंग्रजीतील शब्द-वाक्य कोश. शिक्षकांसाठी संवाद साधण्याचे साधन म्हणून तसेच पहिलीपासून इंग्रजी अध्यापनात उपयुक्त असे हे साहित्य आहे.<br>संपादन - डॉ. रवींद्र अंबेकर<br>प्रकाशक - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ. | मुख्यत : शिक्षक वापरू शकतील असे हे साहित्य आहे. |
| १५. | संगमेश्वरी बोली साहित्य | संगमेश्वरी - मराठी | दैनंदिन वापरातील काही वाक्प्रचार, गाणी, संवाद, म्हणी, कथा, लोकगीते, नाट्यछटा, इत्यादी. | रत्नागिरी जिल्ह्यात वापरल्या जाणाऱ्या संगमेश्वरी भाषेतून तयार करण्यात आलेल्या या साहित्यात दैनंदिन वापरातील काही वाक्प्रचार, गाणी, संवाद, म्हणी, कथा, लोकगीते, नाट्यछटा, इत्यादीचा संग्रह करण्यात आलेला आहे. याशिवाय इ. १ ते ५ च्या मराठी पाठ्यपुस्तकांवर आधारित संगमेश्वरी -मराठी शब्दकोशाचा यात समावेश आहे. स्थानिक मुलांशी संवाद साधण्यासाठी उपयुक्त असे हे साहित्य आहे.<br>प्रकाशक - संगमेश्वरी बोलीभाषा अभ्यास गट, पंचायत समिती देवरूख, जि. रत्नागिरी (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी अंतर्गत) | शिक्षकांसाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त. |

| क्र. | साहित्याचे नाव | भाषा | प्रकार | थोडक्यात वर्णन | अपेक्षित वाचक |
|---|---|---|---|---|---|
| १६. | बितेल बाता | तडवी (भिल्ली) भाषेतील काव्यसंग्रह | तडवी (भिल्ली) भाषेतील कविता. मुक्त छंदातील, | खानदेशातील आदिवासी समाजाचे जीवन दाखवणाऱ्या कविता. भाषा शिकलेल्या शिक्षकांसाठी तसेच पालकांसाठी उपयुक्त.<br>कवी - रमाजन गुलजार तडवी<br>प्रकाशन - रुक्मिणी प्रकाशन. जळगाव | शिक्षक, पालक यांच्यासाठी |
| १७. | कनसारी डुलं | वारली भाषेतील काव्यसंग्रह | कविता, गाणी | वारली समाजातील मुले खेळताना, गुरे राखताना, शेतात लावणी करताना गातात त्या गाण्यांचा, कवितांचा संग्रह.<br>कवी - संपत देवजी ठाणकर<br>प्रकाशक - वारली प्रकाशन, जीतागांव, डहाणू | मुलांसोबत वापरण्यासाठी शिक्षकांना उपयुक्त ठरतील अशी गाणी आहेत. |
| १८. | पावरी | भिलोरी काव्यसंग्रह | भिलोरी भाषेतील कविता, मुख्यत: मुक्तछंदात लिहिलेल्या | आदिवासी समाजाचे जीवन, संघर्ष चित्रित करणाऱ्या कविता. भिलोरी वाचू लागलेल्या शिक्षक किंवा पालकांसाठी उपयुक्त ठरतील.<br>कवी - सुनील गायकवाड<br>प्रकाशक - तिफण प्रकाशन, कन्नड, औरंगाबाद | मुख्यत : शिक्षकांसाठी. |




# शाळा मां जाणे दे रा

दवडी दवडी खेलो लागे
बाबा मेहें शाळा मां जाणे दे रा
शाळा मां एक दोन हिक लागे
शाळा मां अबकड हिक लागे
दादा हाते हिक लागे

दादा हा एखला हां जाणे देतलू
मे ही एखली हीं कुंढी राखतलू
दादा हाते प्लावं लागे

सुरू काय सुरी काय हारकांजरा
हिकावणे ओये तेबी दुयहं मेकेरा
सुरीने हिकणें अधिकारं रा




झांसी राणीने अवतारं रा
सावित्री माईने प्रकाश दे दो रा
अन्याय विरोध लढणे दे रा

QUEST

कविता : केवलसिंग गुरुजी
चित्र : श्रद्धा किरकिरे

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,
मुंबई

TATA TRUSTS

QUEST
Freedom & Rationality

क्वालिटी एज्युकेशन सपोर्ट ट्रस्ट